सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://www.dte.maharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : १०/एडीएम/हिवाळी सुट्टी २०२५-२६/ ५१४ दिनांक : 13 NOV 2025

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६मधील हिवाळी सुट्टीबाबत....

संदर्भ :- १. शैक्षणिक वेळापत्रक क्र.MSBTE/D-४०/Academic Calendar/२०२५/१३६, दि.२२.०५.२०२५
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे ई ऑफीस पत्र क्र.D-५१/winter vacation/१/१७६७५३९/२०२५ दि.९.१०.२०२५

सर्व शासकीय व शासकीय अनुदानित व विनाअनुदानित तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर पदविका संस्थांमधील (स्वायत्त तंत्रनिकेतनांव्यतिरिक्त इतर) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रतिवर्षी २० दिवस हिवाळी सुट्टी व ४० दिवस उन्हाळी सुट्टी देण्यात येते.

त्याअनुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील जे कर्मचारी (व्हॅकेशनल स्टाफ) सुट्टीस पात्र आहेत, त्यांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी संदर्भाधीन पत्रांन्वये प्रस्तावित केल्यानुसार पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षेच्या कामासाठी, मंडळस्तरावरील कामकाज, "स्कूल कनेक्ट" उपक्रम तसेच इतर शैक्षणिक कामाकरीता ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा आवश्यक आहेत, त्यांना थोपवून दि. २४.११.२०२५ ते १३.१२.२०२५ पर्यंत एकूण २० दिवस हिवाळी सुट्टी देण्यात यावी.

परीक्षा व मंडळस्तरावरील कामकाज या महत्वाच्या कामासाठी ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना थांबविण्यात येईल ते उपरोक्त नमूद कामे सुरळीत पार पाडतील व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यांना पुढे असेही कळविण्यात येते की, संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्गाकडून सदर कामांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा कामचुकारपणा दिसून आल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, हे ही संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

तसेच ज्या संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता दिलेली आहे, त्या संस्थांना त्यांचा अभ्यासक्रम पुर्ण करण्याच्या कालावधीचा विचार करुन तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्या कामासाठी लागणारा अधिकारी/कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाईल, या अटीवर त्यांच्या सोईनुसार सुट्टी देण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, सदर सुट्टी २० दिवसांपेक्षा जास्त असू नये.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा (पु.), मुंबई-५१.
२) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/छ.संभाजीनगर/ मुंबई/ नागपूर/नाशिक/पुणे.
३) उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, छ.संभाजीनगर /मुंबई/नागपूर/पुणे.
४) प्राचार्य,शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित तंत्रनिकेतने/ इतर तत्सम पदविका संस्था (विभागीय कार्यालयामार्फत
५) कार्यासन क्रमांक २, ४, ४अ, १२, मुख्य कार्यालय, मुंबई.
६) का.क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.